# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
**Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik**
सर्व्हे नं.648/ब 2, फा. प्लॉट नं. 311 पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक - 422 002 (दूरध्वनी : 0253-2959787) email : nmrda.nsk@gmail.com


## कार्यालयीन परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील क्षेत्रातील जमिनींमध्ये अभिन्यास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करते वेळी त्यात विद्यमान पाण्याचे स्रोत जसे की. विहीर, कूपनलिका (बोअरवेल), नाला इ. असल्यास, ते अभिन्यास नकाशात दर्शविले आहेत किंवा कसे याबाबतची खातरजमा प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण करून तसेच संबंधित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदींनुसार करण्यात यावी. अभिन्यास मंजूर करते वेळी प्रस्तुत पाण्याचे स्रोतांचे संवर्धन अथवा पुनर्भरण करणेबाबतच्या सूचना मंजुरीच्या आदेशात नमूद करण्यात याव्यात. जसे की, एखाद्या जागेत विद्यमान विहीर असल्यास, विहिरीच्या सभोवताली संरक्षक कठडा बांधणे, विहिरीच्या साठवण क्षमतेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करणे, विहिरीमध्ये लगतच्या जमिनीतून होणारा पाण्याचा पाझर वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करणे, इत्यादी. तसेच अभिन्यासाखालील जागेत जमा होणारे पावसाचे पाणी त्याच क्षेत्रात विविक्षित ठिकाणी जमा करून Rain Water Harvesting प्रणाली द्वारे भूजलाची पातळी वाढविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक असेल.

तसेच पूर्व मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्रात अस्तित्वातील विद्यमान विहीर/विहिरी असल्यास, त्याबाबत geo-tagged data संकलित करून, सदर विहिरींचे देखील योग्य संवर्धन होईल, याची खातरजमा करण्यात यावी.

सदर विहिरींचे संवर्धन झाल्यास पावसाच्या पाण्याचा जमिनीत होणारा पाझर वाढून, परिसराच्या भू-जल पातळीत सुधारणा होण्यास मदत होईल. तसेच लगतच्या परिसरातील रहिवासी वापराकरिता संबंधित प्राधिकरणामार्फत नियमित पाणी पुरवठ्याची सुविधा उपलब्ध होईपावेतो, सदर विहिरींमधून तात्पुरत्या स्वरुपात पाणी पुरवठा सुनिश्चित करणे शक्य होईल. तरी, अशा पद्धतीने संबंधित विकासक अथवा जमीन मालकांकडून विद्यमान विहिरींचे संवर्धन झाल्यास, त्यांना प्रोत्साहनात्मक मोबदला देण्याचे प्रस्तावीत करण्यात येईल.

जा.क्र.नामप्रविप्रा/का.प./जल संवर्धन/२५९
दि. १९/०३/२०२५

Nashik Metropolitan Region Development Authority ★ Nashik

(डॉ माणिक गुरसळ, भा प्र से)
महानगर आयुक्त,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

प्रत कार्यवाहीस्तव:
१. महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
२. सह महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.

३. सर्व उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.

४. सर्व सहायक महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.

प्रत माहितीस्तव:

१. क्रेडाई, नाशिक

२. न.रे.ड.को., नाशिक

३. आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशन, नाशिक.

४. आय.आय.ए.

५. ए.सी.सी.ई.

टीप : सदरचे परिपत्रक NMRDA च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.